# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

ई-मेल:- smkcnhm@gmail.com

रजिस्ट्रेशन नं. - महाराष्ट्र/७६०/०५/सांगली दि.१५/१२/२००५

जा.क्र./मनपा/आरोवि रु/राआअ/५३०/२०२५ दि. १८/०९ /२०२५

## जाहिर सुचना

विषय:- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रासाठी स्वच्छता स्वच्छता साहित्य पुरवठा करणेकामी दरकरार दरपत्रक सादर करणेबाबत. . .

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या ठिकाणी खालील नमुद साहित्याचा पुरवठा करणेकामी मान्यता प्राप्त व इच्छुक मक्तेदाराकडून खालीलप्रमाणे दरपत्रक मागवणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामगिरीचा तपशील | संख्या | कोटेशन दर (करासह) |
|---|---|---|---|
| १ | फिनाईल ५ लिटर | प्रतिनग | |
| २ | हँड सॅनिटायझर ५ लिटर | प्रतिनग | |
| ३ | ॲसिड | प्रतिनग | |
| ४ | सोडियम हायपोक्लोराईड ५ लिटर | प्रतिनग | |

यास्तव सदर तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे साहित्याचा पुरवठा करण्यास आपण इच्छूक असल्यास त्यासंदर्भातील आपले दरपत्रक दि.२९/९/२०२५ पर्यंत कार्यालयास स्वहस्ते/ पोस्टाने कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावी. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती:**

१) दरपत्रक "Medical Officer of Health, Sangli Miraj Kupwad Municipal Corporation" यांचे नांवे सादर करावे व लखोटयावर "**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये साहित्याचा पुरवठा करणेकामी**"असा उल्लेख असावा.

२) पुरवठादाराने चालू वर्षातील संस्था नोंदणी प्रमाणपत्र/शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, GST नोंदणी प्रमाणपत्र आणि पॅन कार्ड चे झेरॉक्स दरपत्रकासोबत सादर कराव्यात.

३) GST नोंदणी लागू नसल्यास त्याबाबतचे सी.ए.चे प्रमाणपत्र जोडावे (टॅक्स कन्सल्टंटचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही).

४) देय्यक रक्कम मंजूर दराप्रमाणे NEFT/PFMS व्दारे अदा करणेत येईल.

५) GST दरामध्ये वाढ झाल्यास दरामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय या कार्यालयाकडे राहिल.

६) कोणतीही साहित्य निकृष्ट दर्जाची असल्याचे आढळून आल्यास ती साहित्य बदलून नविन देणे बंधनकारक राहिल.

७) दरपत्रक सादर करताना स्थानिक बाजारातील पुरवठदारांचा विचार करण्यात येईल.

८) प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

९) सदर साहित्य बसवणे व त्याचे प्रात्यक्षिक देण्याची जबाबदारी सदर मक्तेदाराची असेल.

१०) पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचनेशिवाय दरकरार रदद करण्यात येईल आणि मंजूर पुरवठाधारकाचे नाव काळया यादीत घालणेची कारवाई केली जाईल.

११) दरकरार करण्यात येतील व मंजुर दराप्रमाणे आवश्यक्तेनुसार वेळोवेळी कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

१२) काही तांत्रिक अडचणीमुळे दरपत्रक नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक प्रक्रिया रदद करणेचा अधिकार मा. वैदयकीय आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

(डॉ.वैभव पाटील)
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
सांगली मिरज कुपवाड
महानगरपालिका